गणेशोत्सव २०२६—विसर्जन प्रेसमिट संबंधाने :—

१) गणेशमुर्ती :— नागपुर शहरात एकुण १,७०२ सार्वजनिक गणेशमंडळांची नोंद असुन, घरगुती गणेशमुर्ती अंदाजे ०२ लाख ०४ हजार आहेत. मागील वर्षीच्या तुलनते यावर्षी १४० सार्वजनिक मंडळांची वाढ झाली आहे.

२) विसर्जन मिरवणुकीच्या मार्गातील जास्त गर्दीचा भाग :— सि.ए. रोड, फुटाळा रोड, कोराडी रोड, ईतवारी रोड, महाल, जाफर नगर, कॉटन मार्केट, गांधीनगर/जाफरनगर परीसर, भांडेवाडी ईत्यादी.

३) प्रमुख विसर्जन स्थळे :— गोरेवाडा—३६१, पोलीस लाईन टाकळी तलाव— ४२, नांदा कोराडी— ६१२, कच्छीविसा— ६२, महादेव घाट— १०४ तसेच, म.न.पा. ने तयार केलेले कृत्रीम तलाव— ५१२ मुर्ती विसर्जन अपेक्षीत आहेत.

४) मार्गातील बदल :— काही मंडळांनी नियमित मिरवणुक मार्गात बदल केले असुन, काही गणेशमुर्तीचे विसर्जन कोराडी तलाव ऐवजी गोरेवाडा तलाव, पोलीस लाईन टाकळी तलाव येथे करणार आहे.

५) वाहतुक व्यवस्था :— दिनांक २५ व २६.०९.२०२६ चे २०.०० वा. ते २४.०० वा. चे दरम्यान, जड वाहनांस ०३ रस्ते मुख्यत: १) आग्याराम देवी चौक ते गणेश मंदीर कटींग, २) मॉडेल मिल चौक ते मौलाना नातिक चौक, ३) टिळक पुतळा ते गणेश मंदीर कटींग यावरून शहरात प्रवेश बंदी करण्यात आली आहे. तसेच, १) मॉडेल मिल चौकातील वाहतुक रामकुलर व जाधव चौकाकडे २) आग्याराम देवी चौकातील वाहतुक जाधव चौक व रमन सायन्स पार्ककडे ३) मौलाना नातिक चौक व टिळक पुतळा चौकातील वाहतुकीस रमन सायन्सकडे डायव्हर्जन देण्यात आले आहे.

६) पोलीस बंदोबस्त :— नागपुर आयुक्तालयात एकुण ८,५०० पोलीस अधिकारी व अंमलदार असुन, त्यापैकी ७० टक्के मनुष्यबळाचा बंदोबस्त गणेशविसर्जनाकरीता लावण्यात येणार आहेत. ज्यामध्ये, ०१ पोलीस आयुक्त, ०१ सह. पोलीस आयुक्त, ०३ अपर पोलीस आयुक्त, ११ पोलीस उपायुक्त, १५ सहा. पोलीस आयुक्त, ८७ पोलीस निरीक्षक, ३७४ सपोनि./पोउपनि. ज्यामध्ये ४० प्रशिक्षणार्थी पोउपनि., ४,३३० पोलीस अंमलदार ज्यामध्ये ४२० प्रशिक्षणार्थी, १,२६६ होमगार्ड आणि राज्य राखीव पोलीस दलाची ०१ कंपनी, ०४ दंगल नियंत्रण पथके, ०४ जलद प्रतिसाद पथके, ०३ बॉम्ब शोधक व नाशक पथके आणि साध्या वेशातील पोलीस असे एकुण ६,२५० अधिकारी व अंमलदार यांचा बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे.

७) ईतर अनुषंगीक व्यवस्था :— अग्नीशमन दलाचे १२ फायर स्टेशन, ३१ अग्नीशमन वाहने व १३ आपत्ती व्यवस्थापन पथके उपलब्ध राहणार आहेत. नागपुर शहरातील एकुण २,८५८ सिसिटीव्ही कॅमऱ्यांचे मार्फतीने कमान्ड कंट्रोल सेंटरद्वारे नियंत्रण ठेवले जाणार आहे. ०५ मोबाईल सर्व्हेलन्स व्हॅन/ड्रोन उपलब्ध असुन, कार्यक्षम ड्रोनद्वारे गर्दीवर देखरेख ठेवली जाणार आहे.

८) सायबर देखरेख :— गणेशोत्सव २०२६ विसर्जनाचे पार्श्वभुमीवर एकुण ७७१ सोशल मिडीया पोस्ट/व्हीडीयोंचे मॉनिटरींग करण्यात आले असुन, आक्षेपार्ह १३ पोस्टवर कारवाई करण्यात आल्या असुन, सतत देखरेख सुरू आहे.

९) ध्वनी क्षेपकाबाबत नियम :— न्यायालयीन व शासन निर्देशानुसार ध्वनी क्षेपक वापरास वेळेची मर्यादा लागु असुन यापुर्वीच अधिसुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

१०) मिरवणुक व्यवस्थापन :— मिरवणुकीदरम्यान ०२ मंडळांमध्ये योग्य ते अंतर ठेवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

११) गुन्हे प्रतीबंधक कार्यवाही :— नागपुर शहरातील एकुण ७६६ अभिलेखावरील गुन्हेगार तपासणी करण्यात आली आहे. ४१३ तडीपार आरोपींची तपासणी करण्यात आली आहे. ७०५ हिस्ट्रीशिटर ची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी, ८८५ गुन्हेगारांवर प्रतीबंधक कारवाई करण्यात आल्या आहेत. १,४५० ईसमांना नोटीस बजावुन पैकी ५१ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. २२ आरोपींकडुन अवैध शस्त्रे जप्त करण्यात आलेली आहेत. ११८ फरार आरोपींचा शोध घेण्यात आलेला आहे.

सन २०२५ मध्ये, गणेशउत्सवाचे विसर्जण दरम्यान, एकुण ०७ गुन्हे दाखल होते. त्याअनुषंगाने प्रतीबंधक कारवाई करण्यात आली आहे. कलम १६३, ०२ बिएनएसएस नुसार १,०१० गुन्हेगारांवर तात्पुरत्या स्वरूपाची तडीपार प्रतीबंधक कारवाई करण्यात आली आहे.

१२) हेल्पलाईन नंबर :— १) ०७१२— २५८४३७७ सायबर पोलीस ठाणे, २) ०७१२— २५६१२२२ पोलीस नियंत्रण कक्ष
३) डायल ११२ इमरजन्सी नंबर

स्वा/—
( नितीन चुलपार )
सहा. पोलीस निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.